



REGISTERED No. B. 3434

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख ६ नोव्हेंबर १९४६ अंक ४३


## तीच सुदिन

कीं

ज्या दिवशीं भारतावर

स्वातंत्र्यसूर्य चमकेल

पण हा सुदिन आपण स्वयंसिद्ध झाल्याविना कसा दिसेल!

याकरतां देशांतील सर्व उद्योगधंदे पूर्ण राष्ट्रीय करून परदेशांत जाणारा द्रव्यौघ थांबविणें, हें आपलें आद्य कर्तव्य ठरतें. तरी आयुष्याच्या विम्याचा धंदा करणारी

येथील सुप्रसिद्ध

## कॉमनवेल्थ

## विमा कंपनी लि.,


येथें आपला स्वतःचा विमा उतरून आपल्या कर्तव्यांतून मुक्त व्हा.

एजन्सीसाठी आजच लिहा अगर भेटा

ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर—अध्यक्ष

व एस. एम जोशी—मॅनेजिंग डायरेक्टर





अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेटस

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या!

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड .... किर्लोस्करवाडी



लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

नांगर —यांचे— वरक

| नांगर | वरक |
|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | राजा ( एक बैली ) |

'मधुकर' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

## विविध माहिती

**इन्स्टिटयूटसाठी एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर**—मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटनें एक्झिक्यूटिव्ह ऑफिसरच्या जागेसाठी अर्ज मागविले आहेत. मुंबई येथें स्थापन व्हावयाची सहकारी शाळेची व्यवस्था त्यानें पहावयाची आहे आणि महाराष्ट्र, कर्नाटक व गुजरात ह्यांत स्थापन व्हावयाच्या प्रादेशिक शाळांवर त्यानें देखरेख करावयाची आहे. जागेचा पगार ३००–२–६०० रु. असा आहे. जागेसाठी अर्ज ७ नोव्हेंबरपूर्वी करावयाचे आहेत.

**सोलापूर येथें आणखी दोन बँका**—पंजाब नॅशनल बँक व बँक ऑफ इंडिया ह्यांनीं दिवाळीच्या मुहूर्तावर सोलापूर येथें शाखा उघडल्या.

**संयुक्त प्रांतांतील बँकांमधील वांधा**—संयुक्त प्रांतांतील ४० बँका व त्यांचे नोकर ह्यांचेमधील वांध्याचा निवाडा करण्याचें काम तेथील प्रांतिक सरकारनें लेबर कमिशनरकडे सोपविलें आहे.

**बाहेरून येणाऱ्या इसमांवर कर !**—पन्नास मैलांपेक्षां ज्यास्त अंतरावरून मद्रास शहरांत येणाऱ्या सर्व इसमांवर डोईपट्टी बसविण्याचा अधिकार मद्रास कॉर्पोरेशन मागीत आहे. ह्या मागणीचा सरकार विचार करीत आहे.

**कोल्हापूर शहरांत रेल्वे बुकिंग ऑफिस**—कोल्हापूर शहरांत रेल्वेचीं तिकिटें मिळण्याची सोय एम. एस. एम. रेल्वे लवकरच करणार आहे. बुकिंग ऑफिससाठी जागा मिळविण्यांत आली आहे.

**ग्रेट ब्रिटननें घेतलेलें कर्ज**—अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला ३७५ कोटि डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. त्यापैकी ६० कोटींचें कर्ज त्यानें आतांपर्यंत तीन हप्त्यांत मिळून उचललें आहे. २० कोटींचा हप्ता त्यानें नुकताच घेतला.

**कोल्हापुरांत होजिअरीचा कारखाना निघणार**—कोल्हापूर सरकारनें कोल्हापुरांत एक होजिअरीचा कारखाना स्थापन करण्यासाठी पनावा एजन्सीज लि. ला कांहीं सवलती दिल्या आहेत. दरबार १५ एकर जमीन देणार आहे आणि २० मैलांच्या टापूंत दुसऱ्या कारखान्यास परवानगी देणार नाहीं. दरबार १०% भांडवल घेऊन त्या प्रमाणांत आपले डायरेक्टर नेमणार आहे. कारखाना स्थापण्यासाठी पनावा एजन्सीज लि. १० लाखांची एक कंपनी उभारणार आहे.

**कापडाच्या १२५ नव्या गिरण्या !**—हिंदुस्थानांत १२५ नव्या कापडाच्या गिरण्या स्थापन होणार आहेत. त्यांचा तपशील येथें दिला आहे. सध्या ४१७ गिरण्या चालू आहेत.

| प्रांत | गिरण्या | चात्या |
|---|---|---|
| मुंबई | २४ | ३,५२,००० |
| मद्रास | १६ | ३,२५,००० |
| बंगाल | १२ | २,६४,००० |
| सं. प्रांत | १५ | ४,३७,००० |
| पंजाब | ९ | २,१३,०८८ |
| बिहार | ६ | १,५१,००० |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | ४ | १,१९,००० |
| ओरिसा | ३ | ७५,००० |
| सिंध | ४ | १,००,००० |
| संस्थानें | ३२ | ७,०८,८०० |

वरील माहिती सरकारतर्फे असेंब्लींत सांगण्यांत आली.

**विक्रीकर चौकशी कमिटी**—विक्रीकर कायद्याच्या अंमलबजावणीबाबत चौकशी करून त्यांत सुधारणा सुचविण्यासाठी मुंबई सरकारनें प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली आहे. तिनें लोकांचेकडून सूचना मागविल्या आहेत, त्या कमिटीकडे १५ नोव्हेंबर पूर्वी पोंचल्या पाहिजेत.

**ब्रिप्ला कमर्शिअल कं. ची कारखान्याची खरेदी**—सिकंदराबाद येथील रहिवासी शेठ जहांगिर मिस्त्री ह्यांचेकडून बल्लारशा (जि. चांदा, मध्यप्रांत) येथील त्यांच्या स्वतःच्या मालकीचा दादाभाई पॉटरीज नांवाचा चालू स्थितींतील कारखाना ब्रिप्ला कमर्शिअल कं. लि. नें खरेदी करण्याचें ठरविलें आहे. खरेदीची किंमत अंदाजे ४ लक्ष रु. आहे. कारखान्यांत सध्या फायर ब्रिक्स, ड्रेनेजचे नळ (४, ६ व ९ इंची) आणि मंगलोरी कौलें हा माल तयार होतो.

**एकूण १५ कोटि लोक रॅशनिंग खाली आले**—हिंदुस्थानांत आतां ७७१ शहरांतील व गांवांतील १५ कोटि लोकांना रेशन पद्धतीनें धान्य मिळतें. ५५ लक्ष वस्तीच्या ४२० आणखी गांवांना रेशनिंग लवकरच लागू होणार आहे.

**इंडियन न्यूजपेपर्स को. सोसायटी**—वृत्तपत्रांना लागणारा न्यूजप्रिंट कागद मिळवून तो वाटण्यासाठी वरील नांवाची एक सहकारी सोसायटी काढण्याचें हिंदी वृत्तपत्रांच्या प्रातिनिधिक संस्थेनें ठरविलें आहे. सोसायटीचें २ लक्ष रुपयांचें भांडवल प्रत्येकी ५०० रुपयांच्या ४०० विभागांत विभागलें जाईल.

**पैसे पाठविण्याच्या सवलती**—ब्रिटिश हिंदुस्थानांतील सहकारी बँका व सोसायट्या ह्यांस पैसे पाठविण्याबाबत रिझर्व्ह बँकेनें ज्या सवलती दिल्या आहेत, त्या संस्थानांत स्थापन झालेल्या बँका व सोसायट्या ह्यांसहि देण्याचें रिझर्व्ह बँकेनें मान्य केलें आहे.

**ग्वालेरमध्यें शुगरकेन डेव्हलपमेंट बोर्ड**—उसाच्या सुधारणेसाठी ग्वालेर सरकारनें शुगरकेन डेव्हलपमेंट बोर्ड स्थापन केलें आहे. ग्वालेर शुगर कंपनी लि. जो ऊंस विकत घेईल त्यावर मणामागें एक आणा पट्टी वसूल केली जाईल आणि तिचा विनियोग उसाच्या लागवडींत सुधारणा करण्याकडे केला जाईल.

**मोटारींची खरेदी**—ऑगस्ट १९४६ मध्यें ग्रेट ब्रिटननें ६,५९२ मोटारींची निर्गत केली. त्यांपैकी हिंदुस्थानानें ८३६ गाड्या घेतल्या.


आजच्या गंभीर परिस्थितींत विमा उतरविणें अत्यंत आवश्यक आहे. कुटुंबवत्सल लोकांचें तर तें आद्य कर्तव्य आहे!

विश्वभारती विमा कंपनी आपणांस वरील सर्व काळजींतून मुक्त करील अशी आम्ही आपणांस ग्वाही देतों.

*** आग * आयुर्विमा * मोटर अपघात**
*** मरिन * वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ***

| अधिकृत भांडवल | विक्रिय भांडवल | वसूल भांडवल |
|---|---|---|
| रु. २५,००,००० | रु. ११,००,००० | रु. ८,७५,००० |

चेअरमन व मॅनेजिंग डिरेक्टर — श्री. रामराव गणपतराव विजयकर

मॅनेजिंग डिरेक्टर — श्री. चंद्रशंकर गि. द्विवेदी

बाहेरगांवीं त्याचप्रमाणें मुंबईमध्यें एजन्सीसाठीं लिहा

# विश्वभारती

## इन्शुअरन्स कंपनी लि०

नोबल चेंबर्स, पारसी बझार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

ब्रँचीस व ऑर्गनायझिंग ऑफिसीस:–अहमदाबाद, सुरत, नागपूर, पूणा, मद्रास, गुंतुर, कलकत्ता, मंगलोर, कराची, बडोदें, भडोच, भावनगर.

# अर्थ

बुधवार, ता. ६ नोव्हेंबर १९४६


संस्थापक

संपादक : श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ४ रु. किरकोळ अं. २ आणे.

प्रो. वा. गो. काळे


# मुंबई सरकारची ८६ कोटींची पंचवार्षिक योजना

## कार्यक्रम पार पाडण्यास लायक अधिकाऱ्यांची व नोकरांची आवश्यकता

९३ कलमाखालील मुंबई सरकारनें प्रांतिक पुनर्घटनेची एक ठोकळ योजना तयार केली होती. तिचा मुख्य उद्देश खेडेगांवांतील लोकांची आर्थिक स्थिति सुधारणें, असा होता. ह्या योजनेची अंमलबजावणी तीन पंचवार्षिक हप्त्यांत वाटून घ्यावयाचें ठरलें होतें. (१) योजनेंतील कांहीं बाबी विशेष प्राधान्याच्या गणण्यांत आल्या होत्या, (२) कांहीं बाबींची व्याप्ति सबंद प्रांताएवढी होती, (३) कांहीं विशिष्ट बाबी विशिष्ट क्षेत्रासाठींच होत्या व (४) योजनेंतील कांहीं बाबी कांहीं क्षेत्रांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी मुख्यतः आखण्यांत आल्या होत्या. ह्या चवथ्या प्रकारच्या बाबींसाठीं वेगवेगळ्या जिल्ह्यांतील विशिष्ट तालुक्यांची निवड करण्यांत आली होती. ही निवड करतांना प्रत्येक जिल्ह्यानें व तालुक्यानें दिलेले लष्करी रिक्रूट विचारांत घेण्यांत आले होते. एकूण योजनेवर पहिल्या पांच वर्षांत ६० कोटि रुपये खर्च करण्यांत यावयाचे होते.

मुंबई प्रांताच्या नव्या लोकमतानुवर्ती सरकारनें आपलें उद्दिष्ट मार्गेंच जाहीर केलें होतें. तथापि, विशिष्ट मर्यादेंत विशिष्ट बाबींवर करावयाची तपशीलवार योजना त्यानें अद्याप प्रसिद्ध केली नव्हती. प्रांतिक मंत्रि-मंडळानें आतां एक पंचवार्षिक योजना तयार केली आहे आणि तिचा तपशीलहि उपलब्ध झाला आहे. चार महिन्यांपूर्वी सरकारनें जाहिर केलेल्या धोरणास आतां निश्चितपणा प्राप्त झाला आहे. पिण्यासाठी पाणी, सर्पण, कापड, शेती, घरें, शिक्षण, आरोग्य, खेडेगांवी व इतर उद्योगधंदे, कालवे, वीज, सहकारी चळवळ, इत्यादि बाबत योजनांचा पंचवार्षिक योजनेंत समावेश झालेला आहे. भांडवली व इतर खर्च मिळून ८६,६०,९१,००० रुपये ह्या योजनेवर पांच वर्षांत खर्च व्हावयाचे आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणें आहे:—

| बाब | | रुपये |
|---|---|---|
| शेती | | १६,०३,४२,००० |
| शिक्षण | | १६,८३,५१,००० |
| आरोग्य व दवाखाने | | १०,०४,७५,००० |
| खेड्यांच्या तोंडाचे रस्ते, इतर रस्ते व आवश्यक इमारती | | १०,६६,२०,००० |
| पाणीपुरवठा (कालवे वगैरे) | | ९,५०,००,००० |
| वीजउत्पादन व पुरवठा (ग्रिड) | | ८,४६,००,००० |
| कामगारांच्या सुखसोयी (रहाण्याची, शिक्षणाची, करमणुकीची वगैरे सोय) | | ८,००,००,००० |
| मोटार व इतर सार्वजनिक वहातुकीवर सरकारी मालकी | | ३,४४,६८,००० |
| खेडेगांवी व इतर धंदे, मच्छीमारी | | १,२०,००,००० |
| मागासलेल्या वर्गांचा उद्धार, | सुमारें | १,००,००,००० |
| पी. डब्ल्यू. डी. चा व इतर नोकर वर्ग ह्यांचा शिक्षण खर्च आणि व्यवस्थेचा खर्च | सुमारें | १,५०,००,००० |
| | एकूण | ८६,६०,९१,००० |

ह्या एवढ्या मोठ्या खर्चाची तरतूद कशी केली जाईल हें कर भरणाऱ्या नागरिकांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे. पुनर्घटना खात्याच्या मंत्र्यांनीं त्याबाबत खालील व्यवस्था जाहीर केली आहे:—

| | | कोटी रु. |
|---|---|---|
| हिंदुस्थान सरकारकडून मदत | | १७½ |
| पुनर्घटना फंडापैकी | | १२½ |
| पांच वर्षांतील सरकारी उत्पन्न–खर्चांमधील वाढावा | | १० |
| लादावयाच्या नव्या करांचें उत्पन्न | | १० |
| नवीं कर्जें | सुमारें | ३० |
| | एकूण | ८० |

पांच वर्षांचे अखेर दरसाल ६ कोटि रुपये खर्च येत जाईल त्यापैकी १½ कोटि रुपये कर्जांवरील व्याज व त्यांचें मुद्दल ह्यांच्या फेडीसाठीं लागतील. उरलेले ४½ कोटि रुपये खर्चासाठी उपलब्ध होतील.

९३ कलमाखालील सरकारनें ६० कोटींचा खर्च पांच वर्षांत कसा करावयाचा ठरविला होता, हें तुलनेसाठीं खाली दिलें आहे:—

| | कोटी रु. |
|---|---|
| रस्ते | २० |
| शेती | १५½ |
| वीज | ५ |
| शिक्षण | ३½ |
| आरोग्य | ३½ |
| इतर (औद्योगिक शाळा, कामगारांच्या सुखसोयी, इ.) | १½ |
| आखावयाच्या इतर योजना | ११ |
| | ६० |

ह्या खर्चाची व्यवस्था खालील प्रमाणें आखली होती:—

| | कोटी रु. |
|---|---|
| मध्यवर्ती सरकारची मदत | २० |
| पुनर्घटना फंडापैकी | १५ |
| पांच वर्षांतील सरकारी उत्पन्न-खर्चांतील वाढावा | १० |
| कर किंवा कर्ज | १५ |
| | ६० |

मुंबई सरकारच्या नव्या योजनेचा विचार करतांना, एवढा मोठा खर्च कार्यक्षम रीतीनें करण्यास पुरेसें मनुष्यबळ उपलब्ध आहे किंवा नाहीं, हा महत्त्वाचा प्रश्न उपलब्ध होतो. सरकारास सध्यांच लायक नोकरांचा मोठा तुटवडा भासत आहे आणि नोकरांच्या अभावीं कामें तुंबून राहूं लागलीं आहेत. पब्लिक वर्क्स खात्यांतील नेहमींच्या कित्येक जागाहि अद्याप रिकाम्या आहेत. अशा परिस्थितींत, नव्या खर्चाच्या मोठ्या योजना पार पाडण्यास लायक नोकरवर्ग मिळण्याची मोठी पंचाईत पडण्याची भीति आहे. ह्याची जाणिव सरकारास आहे, परंतु पुनर्घटनेची योजना अंमलांत आणण्याच्या उत्साहाचे भरांत तिचेकडे पुरेसें लक्ष्य दिलेलें दिसत नाहीं. योजनेस प्रारंभ होण्यास थोडा उशीर झाला तरी चालेल, परंतु मंजूर झालेली रकम खर्चण्यास पुरेसें मनुष्यबळ नाहीं, असा प्रसंग निर्माण होतां कामा नये.

शेतकऱ्यांस मार्गदर्शन करण्याकरितां, इमारती व रस्ते तयार करण्यासाठीं, कालवे खोदण्यासाठी व इतर अनेक बाबींसाठी लायक नोकरवर्ग लागेल. एकट्या शेतकी खात्यासच वरिष्ठ दर्जाचे ३,००० नोकर लागतील, असें जुन्या मुंबई सरकारच्या योजनेंतील अंदाज आहे. ह्यावरून सर्व खात्यांस मिळून किती नवे नोकर लागतील हें लक्षांत येईल. शिक्षण देऊन लायक तरूण तयार करण्यास १ ते ५ वर्षे एवढा काळ लागतो; तेव्हां नोकर तयार करण्याचा व्यापक कार्यक्रम योजनेच्या यशस्वीपणाच्या मुळाशीं असल्याकारणानें तो तात्काळ हातीं घेणें आवश्यक आहे.

# स्फुट विचार

## इंटरनॅशनल बँक व फंड ह्यांचें सभासदत्व

इंटर नॅशनल मोनेटरी फंड व इंटर नॅशनल बँक ह्या संस्थांच्या, हिंदुस्थानाच्या पक्क्या सभासदत्वास मध्यवर्ती असेंब्लीनें आतां मान्यता दिली आहे. ह्या विषयावर असेंब्लींत नुकतीच चर्चा झाली, त्यावेळीं हिंदुस्थानाच्या ग्रेट-ब्रिटनमधील साठलेल्या येण्याच्या वसुलीचा प्रश्न चर्चिला गेला. हिंदुस्थान सरकार ह्याबाबत आपल्या देशाची बाजू जोरानें पुढें मांडील, हें उघड आहे. हिंदुस्थानाचे १,७०० कोटि रुपये ग्रेट ब्रिटनमध्यें बिनव्याजी अडकून राहिले आहेत, त्याच्या वसुलीचा समाधानकारक निकाल लागेपर्यंत हिंदुस्थानानें बँक व फंड ह्यांचें सभासदत्व पत्करून ३२० कोटि रुपयांची जबाबदारी स्वीकारूं नये, असें मि. मनु सुभेदार ह्यांनीं असेंब्लींत मत व्यक्त केलें. उद्योगमंत्री ( माजी फडणवीस ) डॉ. जॉन मथाई ह्यांनीं बँक व फंड ह्यांचेपासून हिंदुस्थानास मिळण्याजोग्या सहायाचा उल्लेख केला व "स्टर्लिंग" येण्याच्या वसुलीबाबत हिंदुस्थान सरकार कसून प्रयत्न करील असें त्यांनीं आश्वासन दिलें. हिंदुस्थानांतील ब्रिटिश मालमत्ता कर्जाचे पोटीं जमा करण्याचा सल्ला श्री. गाडगीळ ह्यांनीं दिला. ग्रेटब्रिटनमध्यें अडकून राहिलेल्या येण्याच्या वसुलीवर हिंदी प्रगतीचें पाऊल सत्वर पुढें पडणें बरेच अवलंबून असल्याकारणानें, ह्यासंबधांतील वाटाघाटीकडे लोकांचें लक्ष वेधून रहाणें स्वाभाविक आहे.

---

## कोळशाचें उत्पादन वाढलें पाहिजे

हिंदुस्थानांतील कोळशाचें उत्पादन देशाच्या विस्ताराच्या मानानें अत्यल्प आहे आणि नव्या औद्योगिकरणाच्या दृष्टीनें पाहतां कोळशाचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता फारच मोठी आहे. सुमारें ३½ कोटि टन कोळशाची मागणी असतांना, हिंदी खाणींतून ३ कोटि टन कोळसा सुद्धां निघत नाहीं. कांहीं काळ तरी हिंदुस्थानास कोळशाची आयात करतां येणार नाहीं आणि कोळसा बाहेरून आणणें इष्टही होणार नाहीं तेव्हां, कोळशाचें उत्पादन वाढविण्याचा कार्यक्रम हातीं घेणें अत्यावश्यक ठरतें. हिंदुस्थान सरकारचे कोल कमिशनर, सर एस. एम. रॉय, ह्यांनीं ह्या प्रश्नाचा उल्लेख आपल्या एका ताज्या भाषणांत नुकताच केला आहे. कोळशाच्या नव्या खाणी शोधून काढणें, चांगल्या दर्जाच्या कोळशाचा विनियोग जरूर तेथेंच होईल ह्याविषयीं दक्षता बाळगणें, वीज वगैरे इतर प्रेरक शक्तींची वाढ करणें, संशोधन चालू करणें, इत्यादि उपाययोजना कोल कमिशनरनें सुचविल्या आहेत.

---

## खादीस उत्तेजन देण्याचें मद्रास सरकारचें धोरण

खादीचा सार्वत्रिक प्रसार व्हावा ह्या उद्देशानें मद्रास सरकारनें नव्या गिरण्यांची स्थापना व जुन्या गिरण्यांची वाढ, ह्यांस बंदी करण्याचें धोरण आखलें आहे. हें धोरण बऱ्याच टीकेस कारणीभूत झालें आहे आणि ह्या टीकेस गांधीजींनीं 'हरिजन' मध्यें उत्तर दिलें आहे. शेतकऱ्यांस फावल्या वेळेंत किफायतशिर काम करतां यावें ह्या दृष्टीनें. खादीचें महत्त्व निर्विवाद आहे आणि खेडेगांवी महत्त्वाचा धंदा म्हणून त्याकडे जनता आपुलकीनें पहात आहे. परंतु, सबंद प्रांतांतील गिरण्यांची प्रगति खुंटवून खादीस कृत्रिम प्रोत्साहन देण्याची मद्रास सरकारची योजना कितपत व्यवहार्थ ठरेल, ह्याविषयीं शंका वाटते. एकीकडे इतर प्रांत नव्या गिरण्यांच्या स्थापनेचा विचार करीत असतांना मद्रास सरकारनें आज त्या प्रांतांस मिळणारी संधी घालवणें हितकारक होणार नाहीं, असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. हिंदुस्थानांत १२५ नव्या गिरण्या स्थापन होणार आहेत, त्यांपैकी मद्रास प्रांताच्या वाट्यास १६ गिरण्या यावयाच्या आहेत. मद्रास सरकारनें त्यांची स्थापना होऊं दिली नाहीं, म्हणून बाकीचे प्रांत थोडेच गप्प रहाणार आहेत! खादी सार्वत्रिक करण्याची योजना कालांतरानें रद्द झाली, तर इतर प्रांतांना मिळालेला पुढाकार मद्रास प्रांतास घातुक ठरेल, असा मुद्दा पुढें मांडण्यांत येत आहे. गेल्या पंधरा वर्षांत मद्रास प्रांतांतील गिरण्यांमधील चात्यांची संख्या ७½ लाखांवरून १५½ लाखांवर गेली आहे आणि मागांची संख्या ५,१८० वरून ७,४८९ इतकी झाली आहे. कपाशीच्या वाढत्या उठावामुळें त्या प्रांतांत कपाशीच्या लागवडीस उत्तेजन मिळालेलें आहे. कम्बोडिया जातीची कपास मद्रास प्रांतांत लावण्यांत येते. तिचें वार्षिक उत्पादन २ लक्ष गाठी इतकें होतें आणि त्या कपाशीची किंमत ६ कोटि रुपये भरते. ही कपास सर्वस्वी गिरण्यांत खपतें; हातमागासाठी ती वापरली जात नाहीं. ह्या एकाच उदाहरणावरून मद्रास सरकारच्या खादीच्या धोरणाचे परिणाम किती दूरगामी होतील, ह्याची कल्पना येईल.

---

## मुंबई प्रांतांतील मोटारवहातुकीचें राष्ट्रीयकरण

मुंबई सरकारनें आपल्या प्रांतांतील मोटारवहातुकीचें राष्ट्रीयकरण करण्याचें योजिलें आहे आणि त्यासाठी युद्धोत्तर योजनेंत ३ कोटि, ४५ लक्ष रुपयांची तरतूदहि केली आहे. रेल-रोड को-ऑर्डिनेशनची १३ कलमाखालील सरकारची योजना आणि नवी योजना ह्यांतील मुख्य फरक म्हणजे आतां मोटार मालकांची वहातुकीच्या धंद्यांतून पूर्णपणें हकालपट्टी होणार आहे, हा होय. पूर्वीच्या योजनेंत मोटार मालकांना त्यांच्या गुंतवणुकीच्या प्रमाणांत ३५% इतके शेअर्स आणि प्रत्येक परमिटमागें १,००० रुपये मोबदला त्याचप्रमाणें डायरेक्टर बोर्डावर प्रतिनिधित्व हीं मिळणार होतीं. मुंबई सरकारच्या नव्या उपक्रमानें मोटारमालकांत अस्वस्थता निर्माण केली असल्यास नवल नाहीं. मोटारमालकांच्या प्रातिनिधिक संस्था ह्या बाबत जागरूक झाल्या आहेत आणि त्यांनीं आपलें म्हणणें संघटितपणें पुढें मांडण्याची तयारी चालविली आहे.

---

## चलनी नोटांचा वटहुकूम रिझर्व्ह बँकेस किफायतशीर होणार

ता. १२ जानेवारी, १९४६ रोजीं हिंदुस्थान सरकारनें एक ऑर्डिनन्स काढून ५००, १,००० व १०,००० रुपयांच्या चलनी नोटा चालणार नाहींत, असें जाहीर केलें. बँकांना त्यांचेजवळील मोठ्या नोटांची मोड मिळण्याची व्यवस्था तात्काळ झाली आणि नागरिकांना २० जानेवारीपर्यंत रिझर्व्ह बँकेकडे किंवा शेड्यूल्ड बँकेकडे अर्ज करून नोटा बदलून घेण्याची सवड देण्यांत आली. काळ्या बाजारांत खोट्या नावानें व्यवहार करणाऱ्या व कर चुकविणाऱ्या लोकांवर झडप घालून त्यांचें नियंत्रण करण्याचा ऑर्डिनन्सचा उद्देश आहे, असें सांगण्यांत आलें. नोटांची मोड मिळण्याची मुदत पुढें २६ जानेवारीपर्यंत वाढविण्यांत आली. रिझर्व्ह बँकेच्या शाखांचे मॅनेजर व अधिकारी ह्यांनीं विशिष्ट बाबतींत ९ फेब्रुवारीपर्यंत मोड देण्यास सवलत ठेवण्यांत आली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आणि डेप्युटी गव्हर्नर हे २६ एप्रिलपर्यंत मोठ्या नोटा स्वीकारूं शकले. त्यानंतर मात्र ह्या नोटा स्वीकारून त्यांची मोड देण्याचा अधिकार सर्वस्वी हिंदुस्थान सरकारकडे आला. मूळ ऑर्डिनन्स ज्या दिवशीं काढण्यांत आला, त्या वेळीं १४३ कोटि, ९७ लक्ष रुपये किंमतीच्या मोठ्या नोटा प्रचलित होत्या. मार्च १९४६ अखेर रिझर्व्ह बँकेनें १२३ कोटि, ३६ लक्ष रुपयांच्या नोटांची मोड दिली. आणि जून १९४६ अखेर ही रकम १२८ कोटि, २ लक्ष रुपयांवर गेली. म्हणजे, १५ कोटी, ९५ लक्ष रुपयांच्या मोठ्या नोटांची मोड लोकांनीं तोंपर्यंत घेतलेली नव्हती. आतां नोटांची मोड मागणाऱ्या अर्जांचें प्रमाण फारच कमी झालें आहे. ज्या नोटांवर कोणीच मालकी सांगीत नाहीं व ज्यांची कोणीच मोड मागति नाहीं, अशा सर्व नोटांची रक्कम रिझर्व्ह बँकेस आपोआप मिळेल, हें उघड आहे. चलनी नोटांच्या वटहुकुमामुळें काळ्या बाजारास किती आळा बसला, हें सांगतां येणार नाहीं. परंतु सुमारें १५ कोटी रुपयांनीं रिझर्व्ह बँकेचा नफा वाढेल, हें मात्र निश्चित.

---

## मॅनेजिंग एजन्सी कमिशन व्यक्तीचें कां कुटुंबाचें?

' अविभक्त हिंदु कुटुंबाच्या कर्त्यास मॅनेजिंग एजन्सी फर्मचा भागीदार म्हणून मिळणारें उत्पन्न त्याचें स्वतःचें समजावें कां अविभक्त कुटुंबाच्या मालकीचें समजावें ? ' असा प्रश्न मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश सर लिओनार्ड स्टोन व न्यायमूर्ती छगला यांचेपुढें, इन्कमटॅक्स कमिशनर विरुद्ध हरिदास पुरुषोत्तम या प्रकरणांत निघाला होता. १९३९–४० सालांतील उत्पन्नाचा हा प्रश्न होता व प्रकरण हायकोर्टाकडे जाईपर्यंत १९४६ साल उजाडलें होतें आणि बिचारा करदाता (असेसी) मरुनहि गेला होता.

प्रतिवादी हरिदास पुरुषोत्तम यांचें व त्यांच्या चौघा मुलांचे एकत्र कुटुंब होतें व हरिदास पुरुषोत्तम हे त्या कुटुंबाचे कर्ते होते. प्रतिवादी व त्यांचे दोघे बंधू अशा तिघांची पुरुषोत्तम गोविंदजी या नांवाची पेढी होती. हे तिघे बंधु एकमेकांपासून विभक्त होते. या पेढींत प्रतिवादीचा जो हिस्सा होता तो एकत्र कुटुंबाचा कर्ता या नात्यानें होता. १९१८ सालीं हे तिघे बंधू व दुसरे पांच लोक यांनीं मिळून हुबळी मिल भागीदारींत खरेदी केली. नंतर १९२० सालीं या ८ जणांनीं भारत स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग कंपनी लि. नांवाची कंपनी स्थापन करून हुबळी मिल या कंपनीकडे देण्याचें ठरविलें. दोन दस्त तयार करण्यांत आले. एक आठ भागीदारांनीं मिल कंपनीला दिल्याचें खरेदीखत होतें आणि दुसरा कागद या आठ भागीदारांना कंपनीचे मॅनेजिंग एजंट नेमल्याचा होता.

प्रतिवादीच्या नांवावर असलेले कंपनींतील सर्व शेअर्स एकत्र कुटुंबाकरितां, कर्ता या नात्यानेंच धारण केलेले होते. १९२४ पासून मॅनेजिंग एजन्सीचें कमिशन एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नांतच दाखविलें होतें. १९३९ सालीं प्रतिवादीनें प्रथमच आक्षेप घेतला कीं मॅनेजिंग एजन्सीचें कमिशन हें प्रतिवादीच्या स्वतःच्या खाजगी वैयक्तिक मालकीचें आहे, एकत्र कुटुंबाच्या मालकीचें नाहीं. प्राप्तीवरील कराच्या अधिकाऱ्यांना प्रतिवादीचें हें म्हणणें मान्य झालें नाहीं व म्हणून हायकोर्टाच्या मतप्रदर्शनार्थ प्रकरण मुंबई हायकोर्टाकडे पाठविण्यांत आलें.

आपल्या निर्णयपत्रांत न्यायमूर्तींनीं म्हटलें आहे कीं प्रतिवादीला मॅनेजिंग एजन्सीचे भागीदार होण्याची संधि हुबळी मिल नव्या कंपनीला विकल्यामुळें आली व त्या मिलची मालकी एकत्र कुटुंबाची होती. तसेंच नव्या कंपनीचे शेअर्स सुद्धां एकत्र कुटुंबाच्या मालकीचे आहेत. या शेअर्सच्या बळावर प्रतिवादीस मॅनेजिंग एजन्सींत जागा मिळाली असल्यामुळें एजन्सीपासून मिळणारें उत्पन्न एकत्र कुटुंबाच्या मालकीचेंच ठरतें.

## दि बेळगांव बँक लि.

वरील बँकेनें ३० जून, १९४६ अखेरच्या वर्षी उत्कृष्ट प्रगति केली आहे. एका वर्षांत खेळतें भांडवल ३४ लाखांवरून ४८ लाखांवर गेलें आणि निवळ नफा १६ हजारांवरून २७ हजारांवर गेला. बँकेनें निपाणी येथें नवीन शाखा उघडून आपल्या एकूण कचेऱ्यांची संख्या १७ केली. बँकेचें वसूल भांडवल ३,२५,११० रुपये असून रिझर्व्ह व इतर फंडांत ५०,२७५ रु. आहेत. बँकेच्या एकूण ४७½ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकीं २२½ लक्ष रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. बँकेत कमिशनचें उत्पन्न चांगलें मिळालें आहे. नफ्यांतून ६¼% करमुक्त डिव्हिडंड देण्यास १६,१२४ रु. लागले आणि ५½ हजार रु. रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले.

## महाराष्ट्र (कापूस–विशेषांक)

मध्यप्रांतांतील अर्थोत्पादक पिकांत कपाशीचें पीक सर्वांत महत्त्वाचें आहे. जगांतील प्रमुख प्रगतिप्रिय देश कपाशीचा दर्जा सुधारून त्याचें उत्पादन वाढविण्याच्या खटपटींत आहेत, परंतु हिंदुस्थानांतील अन्न परिस्थितीमुळें कपाशीचें महत्त्व युद्धकाळांत कमी झालें. मध्यप्रांत वऱ्हाडच्या पुनर्घटनेच्या बाबतींत कपाशीला व गिरण्यांना महत्त्वाचें स्थान आहे. ह्या दृष्टीनें नागपुरच्या " महाराष्ट्र " नें कापूस अंक काढून त्या प्रांताच्या गरजांकडे लक्ष वेधण्याचें महत्त्वाचें काम उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें आहे. अंकांतील लेखांची विविधता चटकन नजरेसमोर येते आणि माहिती मिळविण्यांत व ती मांडण्यांत संपादकांनीं घेतलेली काळजी विशेष उल्लेखनीय आहे. प्रस्तुत विशेषांक केवळ मध्यप्रांतांतील हितसंबंधी लोकांसच नव्हे, तर सर्वच नागरिकांस बोधप्रद वाटेल. किंमत १। रु. पृष्ठें ८८.


सन १९४५ मधील प्रगति
नवें काम ७,००,००० रु.
चालू काम २०,००,००० रु.
१९४५ मधील हप्त्यांचें उत्पन्न
सुमारें १,००,००० रु.
खर्चाचें प्रमाण फक्त ११%
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर














चीफ एजंट:—
न्यू दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें









शेअर विक्री सुरू झाली

# ★ दि हिंदुस्थान स्पन पाईप्स लि., पुणें. ★

लक्ष्मीरोड, गोखले हॉलसमोर

अधिकृत भांडवल : रु. १५,००,००० ( रु. पंधरा लाख )
विक्रीस काढलेलें भांडवल : रु. ५,००,००० ( रु. पांच लाख )
( १४९०० प्रत्येकीं रु. १०० चे ऑर्डिनरी शेअर्स व १ रुपयाचे १०,००० डिफर्ड शेअरमध्यें विभागलेलें ) ( ४९०० ऑर्डिनरी शेअर्स व १०,००० डिफर्ड शेअर्सचे रूपानें )
( मेमोरँडम ऑफ असोसिएशनचे सबस्क्रायबर्स, डायरेक्टर व त्यांचे मित्र वगैरेंनीं पाऊण लाखांचे शेअर घेण्याचें कबूल केलें आहे व ते त्यांचेकरितां राखून ठेवले आहेत. )
प्रत्येक रु. १०० चे ऑर्डिनरी शेअर अर्जाबरोबर रु. २५ व अर्ज मंजुरीनंतर रु. २५ भरावयाचे आहेत. राहिलेले रु. ५० तूर्त मागविण्याचा विचार नाहीं.

## संचालक मंडळ

श्रीमंत बापूसाहेब पंत, औंध,
औंध संस्थानचे युवराज.
श्री. रामभाऊ भगवंत गिरमे एम. एल. ए.,
व्यापारी व बागाईतदार, बेलापूर.
श्री. आर. एन. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.,
पुणें ( एक्सऑफिशिओ )

श्री. जी. व्ही. साळवेकर, बी. ए., ( चेअरमन )
मालक सरदारगृह, मुंबई.
श्री. माधव हरी कचरे, कचरेवाडी, पुणें ४.
व्यापारी व बागाईतदार.
श्री. रामराव जी. विजयकर,
चेअरमन व मॅ. डायरेक्टर, विश्वभारती इन्शुअरन्स कं. लि. मुंबई.

श्री. हरी विनायक पाटसकर,
बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट ( O. S. )
एम. एल. ए. व मेंबर कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली.
श्री. का. वा. पाटणकर, बँकर पुणें.
डायरेक्टर, शुश्रुत फार्मसी लि. पुणें.
श्री. बी. एन. गोरे, बी. एससी., एल. ई. ई.,
( एक्स. ऑफिशिओ )

ही कंपनी ड्रेनेज व पाणीपुरवठ्याकरितां लागणारे सीमेंट कॉंक्रीटचे पाइप ( नळ ) तयार करणार आहे व त्याचप्रमाणें सीमेंटच्या निरनिराळ्या वस्तु; टाईल्स, सीमेंटशीट वगैरे तयार वस्तूंचा धंदा करणार आहे. या वस्तूंना सर्वत्र फार मागणी आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं व यामुळें या धंद्यास फार मोठा वाव आहे व पैसे गुंतविणारांना हा धंदा अत्यंत किफायतशीर होणार आहे. मॅनेजिंग एजंटपैकीं श्री. बी. एन. गोरे यांची कऱ्हाड येथें पाइप फॅक्टरी गेले वर्षापासून चालू आहे. तीच फॅक्टरी कंपनी घेणार असून तिच्यांत योग्य वाढ करणार आहे व म्हणून इतर कंपन्यांप्रमाणें मशिनरी वगैरेकरितां या कंपनीच्या मालाचे उत्पादनास विलंब लागणार नाहीं.

आज कंपनीकडे जवळ जवळ तीन लाखांचे शेअरकरितां अंडररॉयटर्सचे अर्ज आले आहेत. सर्वसाधारण जनतेला या कंपनीचे भागीदार होण्याची संधि मिळावी म्हणून वरील अर्जाचा विचार थोडे दिवस लांबणीवर टाकण्याचें ठरविलें आहे. कंपनी कांहीं मर्यादेपर्यंत ठेवी घेणार आहे. परंतु शेअर्सचे रकमेपेक्षां जास्त ठेवी घेण्याचा कंपनीचा विचार नसल्यामुळें ठेवीदारांचे अर्ज क्रमवारीनेंच स्वीकारले जातील व ही गोष्ट ठेवीदारांनीं ध्यानांत ठेवावी. त्याचप्रमाणें शेअरहोल्डरांच्या ठेवी प्रथम स्वीकारल्या जातील. ठेवींचे दरः—एक वर्ष ४ टक्के; दोन वर्षे ५ टक्के; तीन वर्षे व पुढें ६ टक्के.

शेअर फॉर्म, माहितीपत्रकें व ठेवीबाबत अर्जाचे नमुने मागविण्याचा पत्ताः—

**गोरे अभ्यंकर आणि कं. लि.**
मॅनेजिंग एजंटस्, ९२९ सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, गोखले हॉलसमोर, पुणें २.

सूचनाः—ड्रेनेज पाईपचा माल तयार होत आहे व त्याची विक्रीही लवकरच सुरू करणार आहोत. ऑर्डर देऊं इच्छिणारांनीं मॅनेजिंग एजंटकडे पत्रव्यवहार करावा.

आमचे प्रतिनिधिः—
१ एस. पी. पंडित देशमुखवाडी, सदाशिव पेठ, पुणें. १ जी. जी. दामले दुबोटी चिरा, नगर.
२ जी. के. मांजरेकर अप्पाबळवंत चौक, पुणें. २ वाय. सी. लाटे पो. ओगलेवाडी.

## कायदा व सुव्यवस्थेचे पालक

आधुनिक राज्यव्यवस्थेंत कायदा व सुव्यवस्था यांचे पालक म्हणून मामुली दिवसांत पोलिस-दलाकडेच बोट दाखविण्यांत येतें. आणि कांहीं अपवादभूत प्रसंग सोडल्यास शांततारक्षणाची जबाबदारी पोलिसांना पार पाडावी लागते. लंडनमधील पोलिस-कमिशनरनें या खात्यासंबंधींचा १९४५ सालचा जो अहवाल प्रसिद्ध केला आहे त्यांत पोलिस-दलावर युद्धकाळांत काय परिणाम घडले त्याचें मार्मिक वर्णन केलेलें आहे. धट्टीं-कट्टीं माणसें ब्रिटनच्या लष्करांत गुंतल्यामुळें लंडनमधील पोलिसांच्या वयाची सरासरी ३५ वरून ४५ पर्यंत वाढली. त्याचप्रमाणें कामाचा ताण पडल्यामुळें पोलिसांत आजारी पडण्याचें प्रमाणही वाढलें. युद्ध संपल्यावर लष्करांतून माणसें सेवानिवृत्त होऊं लागलीं. तरी सुद्धां लंडनमधील पोलिसांची एकंदर संख्या १९४५ च्या प्रारंभापेक्षा अखेरीला कमीच होती. उलटपक्षीं कामाचा व्याप मात्र वाढलेला होता. लष्करांतून बाहेर पडलेले सैनिक, व युद्धकाळीं मोठ्या शहरांतून हलविण्यांत आलेले नागरिक हळूहळू परत येऊं लागले. पण शहरांची झालेली पडझड व जीवनोपयोगी वस्तूंची दुर्मिळता यांमुळें गुन्ह्यांची संख्या वाढूं लागली. लंडनमध्यें जानेवारी १९४५ मध्यें ६०० घरफोडीचे व ९०० दुकानफोडीचे गुन्हे झाले होते. डिसेंबरमध्यें हीच संख्या अनुक्रमें ८०० व १३०० इतकी वाढली. पण याहीपेक्षां अधिक धोक्याची निशाणी म्हणजे अल्पवयी गुन्हेगारांच्या संख्येंत झालेली वाढ ही होय. १९३२ सालीं २१ वर्षे वयाच्या खालील गुन्हेगार जितके होते त्याच्या दुप्पट गुन्हेगारांना १९४५ सालीं शिक्षा देण्यांत आल्या. या गुन्ह्यांपैकीं एक तृतियांश इतके गुन्हे १६ वर्षांखालील संघटित होऊन केलेले होते. या गुन्ह्यांच्या संख्येवरून पोलिसांना किती ताण पडला असेल त्याची कल्पना येतेच. पण त्याचबरोबर सामाजिक परिस्थिति अधिक स्थिरावल्याखेरीज सार्वजनिक नीतिमत्ता सुधारत नाहीं हेंही सहज कळण्यासारखें आहे. पोलिसांच्या प्रयत्नाला जनतेमधील सुजाण लोकांची सक्रिय मदत होणेंही जरूर आहे.

**टॅक्सीला विशिष्ट रंग**—टॅक्सी व खासगी मोटार गाडी ह्यांतील फरक चटकन लक्ष्यांत यावा, म्हणून इतर कांहीं देशांत टॅक्सीला विशिष्ट रंग देणें आवश्यक केलेलें असतें. तशी पद्धत हिंदुस्थानांत सुरू होणें आवश्यक आहे, असें एकानें सुचविलें आहे.

**इंदूरच्या औद्योगिक पहाणीसाठी अमेरिकन तज्ज्ञ**—इंदूर संस्थानाची आर्थिक व औद्योगिक पहाणी करून नवीन उद्योगधंद्यांची स्थापना सुचविण्याचे कामीं इंदूर सरकारनें एका अमेरिकन फर्मची योजना केली आहे.

**हिंदी उद्योगधंद्यांत परकी हात नको**—भांडवल आणि व्यवस्था ह्यांत परकीयांस भागीदारी देऊन कारखाने व गिरण्या हिंदुस्थानांत स्थापन होऊं लागल्या आहेत. ह्या अनिष्ट प्रकारास आळा घालण्याचा सल्ला इं. म. चेंबरनें हिंदुस्थान सरकारास दिला आहे. हिंदी भांडवलानें व हिंदी व्यवस्थेखालीच हिंदी उद्योगधंदे चालले पाहिजेत, असा चेंबरचा आग्रह आहे.

## शेतीचें तौलनिक उत्पादन

१९ व्या शतकांत ब्रिटनचा उल्लेख 'जगाचा कारखाना' या सार्थ नांवानें करण्यांत येई. आज तशी स्थिति राहिलेली नाहीं. उलट पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांत शेतीचें उत्पादन मागासलेलें असल्यामुळें ब्रिटनला उपासमारीची भीति सारखी भेडसावीत असे. युद्धकालीन अर्थव्यवस्थेचा एक परिणाम म्हणून ब्रिटनमधील शेतीही आतां चांगली पुढारलेली व यंत्रचालित झालेली आहे. तरी सुद्धां अमेरिकन शेतीच्या मानानें ब्रिटनमधील शेती दर माणशीं उत्पन्नाच्या दृष्टीनें थोडीबहुत मागेंच आहे. १९३७ सालीं ब्रिटनमधील शेतीच्या धंद्यांतील दरडोई उत्पन्न १५९ पौंड होतें. अमेरिकेचें १६६ पौंड होतें. युद्धानंतरही हीच परिस्थिति चालू राहिली असावी असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. तथापि ब्रिटनमधील उद्योगधंद्यांच्या दरडोई उत्पादनाच्या बाबतींत अमेरिका ब्रिटनच्या जितकी पुढें आहे तितकी ती शेतीच्या बाबतींत मात्र नाहीं. ब्रिटन व अमेरिका यांच्या शेतीची व कारखान्यांची तुलना केली तर वरीलप्रमाणें परिस्थिति दिसून येत असली, तरी इतर देशांशीं तुलना केली तर ब्रिटन दोन्हींही बाबतींत पुढारलेलेंच आहे. पण शेतीच्या मालाच्या जागतिक बाजारांत ज्या किंमती ठरविण्यांत येतात त्या ठरलेल्या हुंडणावळीच्या दरानें; अशा प्रकारच्या किंमतीच्या आकारणीनें प्रत्यक्ष उत्पादनाची खरी तुलना होत नाहीं. याशिवाय निरनिराळ्या देशांतील दर एकरीं धान्याच्या उत्पादनाचें प्रमाणही पहावें लागेल. त्याचप्रमाणें शेतीच्या व्यवसायांत वापरण्यांत येणारीं यांत्रिक अवजारें व उत्पादन यांचाही तौलनिक अभ्यास होणें जरूर आहे. अशा अभ्यासानेंच शेतीच्या तौलनिक उत्पादनाची खरी कल्पना येईल.

**हिंदुस्थान सरकारचा उत्पन्न-खर्च**—हिंदुस्थान सरकारनें एप्रिल ते जुलै, १९४६ मध्यें आपल्या उत्पन्नापेक्षा ३६¼ कोटि रुपये अधिक खर्च केला. ह्या अवधींत सरकारच्या कर्जांत १६½ कोटींची भर पडली.

**रशियाच्या स्नेहासाठी तेलाच्या कंपनींत भागीदारी**—उत्तर इराणमध्यें तेलाच्या धंद्यासाठी रशिया व इराण ह्यांची एक जोड कंपनी स्थापण्याचा करार गेल्या एप्रिलमध्यें करण्यांत आला. त्यास २४ ऑक्टोबर पूर्वीं इराणच्या पार्लमेंटची संमति इराणी सरकारनें मिळवावी, असें ठरलें होतें. परंतु नव्या निवडणुकी अद्याप झालेल्या नाहींत. रशियाचा स्नेह संपादून त्या राष्ट्राची इराणच्या स्वातंत्र्यास हमी मिळावी आणि अझर बैजानचा प्रश्न नीट सुटावा, ह्या दृष्टीनें रशिया व इराण ह्यांचे-मधील वरील करारास इराणमध्यें वाढता पाठिंबा मिळत आहे.


**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

आंध्र खादीचे (म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे) —एकमेव विक्रेते— **खादी मन्दिर** २६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| खपलेलें भांडवल | : | २,९७,६७,१०० रु. |
| वसूल झालेलें भांडवल | : | १,४८,८३,५५० रु. |
| रिझर्व्ह फंड | : | १,८३,३३,५५० रु. |

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग, मुंबई.

—शाखा—

अहमदाबाद
- भद्र ( मुख्य ऑफिस )
- एलिस ब्रिज
- स्टेशन ब्रँच
- माणेक चौक

अमृतसर
अंधेरी ( मुंबई शेजारीं )
बांद्रे ( मुंबई शेजारीं )
भुज ( कच्छ )
मुंबई
- बुलियन एक्सचेंज
- कुलाबा
- काळबादेवी
- मलबार हिल

कलकत्ता
- क्लाईव्ह स्ट्रीट ( मुख्य ऑफिस )
- बडा बझार
- चौरंगी स्क्वेअर

कोइमतूर
हैद्राबाद ( सिंध )
जमशेदपूर
जुनागड
कराची
मद्रास
नागपूर
- किंग्जवे
- इतवारी बझार

पालनपूर
पुणें
पुणें शहर
राजकोट
सुरत
वेरावळ

**लंडन शाखा :** १७, मुर गेट, लंडन ई. सी. २

**न्यूयॉर्क एजन्ट्स :**—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

—डायरेक्टर्स—

सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., ( चेअरमन ); मि. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; मि. दिनशा के. दाजी; मि. रामनिवास रामनारायण; ना. सर शांतिदास आस्करण, नाइट; श्री. महंमद सुलेमान कासम मिठा.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

कांहीं ठिकाणें सोडून दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० पेक्षां अधिक शिलकेवरील व्याज फक्त खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं.


कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य दरानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

वुइल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते आणि ट्रस्टींचें सर्वसाधारण काम स्वीकारते. अर्ज करून नियम मागवावेत.

सर्वसाधारण बँकिंगचा व्यवहार केला जातो.

एच्. ए. करीमभॉय
एजंट

## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८




## साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

**व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी**





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.